# मराठी

**वेळ - ३ तास** **गुण - ८०**

## कृतिपत्रिका

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :**

(१) आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या किंवा चौकटी पेनाने अथवा पेन्सिलीने व्यवस्थित काढाव्यात.

(२) स्वच्छता , नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग १ - गद्य [२०]

**कृती १. ( अ ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : ( ८ )**

( १ ) लेखिकेने - मिशन लडाखसाठी राखीपौर्णिमेचा मुहूर्त निवडण्या मागची दोन कारणे : ( २ )

( य ) ☐

( र ) ☐

( २ ) ( य ) मिशन लडाखला निघण्यापूर्वी येथून प्रतिसाद मिळाला : ..................... ( १ )

( र ) कर्नल झा यांनी लेखिकेचे पाठीवर थाप देताना केलेले शाब्दिक कौतुक : ......................... ( १ )

ऑगस्ट महिन्यात श्रावण असतो आणि श्रावण म्हणजे 'राखी पौर्णिमा !' सगळ्यांचा आवडता सण. त्या राखीच्या एका धाग्यानं बहीण-भावाचं नातं कायमचं घट्ट राहातं. बहिणीच्या भावावरील निरपेक्ष प्रेमाची आणि भावावरील तिच्या रक्षणाच्या जबाबदारीची ही भावनिक वीण, मग आपल्या रक्षणकर्त्याला प्रत्यक्ष भेटून राखी बांधली, आशीर्वाद दिले; तर आपली कृतज्ञता व्यक्त होईल आणि राखीचा सन्मान होईल. आमचं एकमत झालं आणि रक्षाबंधनाचा मुहूर्त साधून लोकांना घेऊन कारगिलला जायचं हे निश्चित ठरवलं. चोवीसजण आमच्याबरोबर यायला तयार झाले आणि सुरू झालं 'मिशन लडाख'.

सैनिकांच्या रेजिमेंटमध्ये जायचं, सैनिकांना भेटायचं; म्हणजे जणू सिंहाच्या गुहेत प्रवेश मिळवायचा होता. बऱ्याच खटपटी करून आम्हांला निघण्यापूर्वी १४ कोअरच्या लेहमधील हेडक्वार्टरमधून प्रतिसाद आला. आम्हांला १४ कोअरच्या कर्नल झा यांनी बोलावलं होतं. आमचं मन धास्तावलं, सैन्यदलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी त्यांच्या केबिनमध्ये जाऊन बोलायचं होतं; पण मनातील कित्येक प्रश्नांची भेंडोळी कर्नल झा यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्वापुढे बाद झाली.

"तुम्ही लष्कराचं मनोबळ खूप वाढवत आहात," अशी पाठीवर थाप मिळाली आणि निघताना दारापर्यंत सोडायला आल्यावर कर्नल झा हात हातात घेऊन म्हणाले, "विसरू नका-वन्स कनेक्टेड, ऑलवेज कनेक्टेड." त्यांचा शब्द त्यांनी पुढील वर्षी आणि थेट दहा वर्षांनीही पाळला अरुणाचलमध्ये भारत-चीन सीमेवर भेटून !

(३) स्वमत / अभिव्यक्ती (४)

'सैनिक हेच खरे नायक आहेत.' या विधानाविषयी तुमचे मत व्यक्त करा.

किंवा

'कर्नल झा' यांची स्वाभाववैशिष्ट्ये पाठाच्या आधारे तुमच्या शब्दांत लिहा.

**(आ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा (८)**

(१) चौकटी पूर्ण करा. (२)

वाहनाचा वेग अनिवार होतो, तेव्हा - [ ] [ ]

(२) कारणे लिहा. (२)

अपघात होण्याची दोन कारणे : (य)-----------------(र)------------------

वाहन हे वेळ वाचवण्यासाठी असते. ते वेळ घालवण्यासाठी नसते. त्याचा वेग बेताचा असणे अगत्याचे असते. माणसे चालू आणि पळूही शकतात; पण रस्त्याने कोणी चालण्याऐवजी पळू लागला तर त्याचे कौतुक करावे का? अपेक्षित स्थळी वेळेवर पोचता येईल, अशा बेताने वाहने चालवण्याऐवजी उगाचच भरधाव वेगाने चालवण्यात औचित्य ते कोणते? वाहनाचा वेग वाढला म्हणजे त्याच्यावरचा ताबा कमी होतो. पुढचे वाहन मागे टाकून पुढे जाण्याच्या हव्यासामुळे अनेक अपघात होतात. रात्रीच्या वेळी विलक्षण वेगाने धावणारी गाडी ही रातराणी म्हटली जाते. रात्री भरधाव वेगाने प्रवास करून पार पाडावीत एवढी महत्त्वाची कामे दरवेळी असतात का?
वाहनाचा वेग अनिवार झाला, तर चित्ताची व्यग्रता वाढते. डोळ्यांवर, मनावर, शरीरावर ताण पडतो. शरीरभर अनावश्यक स्पंदने निर्माण होतात. हादरे बसून मज्जातंतू आणि मणके कमकुवत होतात. कमरेची आणि पाठीची दुखणी ही वाहनधारकांची व्यथा असते. बसणे, उठणे, चढणे, उतरणे, चालणे, वळणे, वर-खाली पाहाणे या मुक्त हालचालींचे संगीत विसरून स्वत:ला वाहनाशी जखडून ठेवणे आणि वाहनाचा वेग अंगीकारून आपल्या शरीरव्यापारात अडथळे निर्माण करणे हे धोरण निसर्गविरोधी आहे. आरोग्याची हानी करणारे आहे. जीवनातले ताणतणाव वाढवून पोचणार तरी कोठे? आपले स्वत्व आणि स्वस्थता हिरावून घेणारा अस्वाभाविक वेग कमी करणे, हे आपले कर्तव्य आहे.

(३) स्वमत अभिव्यक्ती (४)

'वाहन हे वेळ वाचवण्यासाठी असते. ते वेळ घालवण्यासाठी नसते' या विषयी तुमचे मत लिहा.

किंवा

'सुरक्षित व सुखाचा प्रवास व्हावा यासाठी वाहन चालावतांना कोणकोणती दक्षता घेतली पाहिजे' ते तुमच्या शब्दांत लिहा.

**(इ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा: (४)**

(१) चौकटी पूर्ण करा. उणे तीस तापमानात शीतलला न जाणवलेल्या गोष्टी - (२)

(य) [ ] (र) [ ]

पुण्याच्या शीतल महाजनने उत्तर ध्रुवावर पॅराशूट जम्पिंग केलं. तेव्हा जमिनीवरील वातावरण उणे तीस डिग्री सेल्सिअस इतकं गोठवणारं होतं. हाड गोठणारी थंडी, बोचरे वारे यातल काही सुद्धा शीतलला जाणवत नव्हतं. कारण ती आपल्या स्वप्नांच्या जवळ होती. आशियन बनावटीच्या MI-८ हेलिकॅप्टरमधून २४०० फुटावरून उडीमारल्यानंतर पॅराशूटच्या साहाय्याने खाली येतांना पंख नसूनही पक्ष्यासारखं उडण्यातला आनंद काय असतो, तो तिने अनुभवला होता. हा अनुभव घेतला तेव्हा हवेतलं तापमान होतं उणे सदतीस डिग्री सेल्सिअस. ही उडी घेतली तेव्हा शीतल पृथ्वीच्या अगदी वरच्या टोकावर म्हणजे On the Top of the Word होती. ज्याला 'झिरो/डिग्री नॉर्थ असे म्हणतात. आपल्या पहिल्याच प्रयत्नात १८ एप्रिल २००४ रोजी उत्तर ध्रुवावर विश्वविक्रमी झेप घेणारी विश्वातली पहिली लहान वयाची भारतीय महिला ठरली. याचवेळी उत्तरध्रुवावर कुठलाही सराव न करता पॅराशूटच्या साहाय्याने उडी घेणारी जगातील पहिली महिला व लहान वयात विक्रम करणारी महिला असे दोन जागतिक विक्रम तिच्या नावावर जमा झाले.

( २ ) शीतल महाजनच्या नावावर जमा असलेले दोन विक्रम- ( २ )

( य ) [ ] ( र ) [ ]

**विभाग २ - पद्य** **[१६]**

**कृती २. ( अ ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. ( ८ )**

( १ ) कामक्रोधरूपी विचू-इंगळी उतरवण्याचे उपाय - ( २ )

( य ) ..........................

( र ) ..........................

( २ ) योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा. ( २ )

( य ) सत्व उतारा, म्हणजे......

( १ ) जीवनसत्त्व देणे.

( २ ) सत्वगुणांना आश्रय घेणे,

( ३ ) सात्विक आहार देणे.

( ४ ) सत्वाचे महत्व सांगणे.

( र ) विंचू चावला वृश्चिक चावला' या शब्दांच्या द्विरुक्तीमुळे -

( १ ) भारुड उत्तम गाता येते.

( २ ) वेदनांचा असह्यपणा तीव्रतेने जाणवतो.

( ३ ) भारुडाला अर्थ प्राप्त होतो.

( ४ ) भारुड अधिक रंजक बनते.

विंचू चावला  वृश्चिक चावला |
कामक्रोध विंचू चावला ।
तम घाम अंगासी आला ॥ धृ.||

पंचप्राण व्याकुळ झाला |
त्याने माझा प्राण चालिला ।
सर्वांगाचा दाह झाला ॥१॥

मनुष्य इंगळी अति दारुण ।
मज नांगा मारिला तिने ।
सर्वांगी वेदना जाण ।
त्या इंगळीची ॥ २ ॥

ह्या विंचवाला उतारा |
तमोगुण मागे सारा ।
सत्त्वगुण लावा अंगारा |
विंचू इंगळी उतरे झरझरां ॥ ३ ॥

सत्त्व उतारा देऊन ।
अवघा सारिला तमोगुण।
किंचित राहिली फुणफुण ।
शांत केली जनार्दने ॥ ४ ॥

( ३ ) अभिव्यक्ती : ( ४ )

सद्‌गुण अंगी बाणविण्यासाठी तुम्ही काय कराल ते तुमच्या शब्दात लिहा.

**(आ)  खालील ओळींचा अर्थ लिहा : ( ४ )**

सरी वाफ्यात, कांदं लावते.
बाई लावते
नाही कांदं ग, जीव लावते
बाई लावते
काळ्या आईला, हिरवं गर्गादते
बाई गोंदते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

**( इ )  खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा : ( ४ )**

काव्य सौंदर्यः  या ओळीतून सूचित होणारे भावसौंदर्य उलगडून दाखवा.

अंगणात थांबलेल्या तुझ्या प्रेयस चांदण्याला
दार उघडून आत घेण्याचेही भान नाही ग तुला
बागेतली ती अल्लड जाईही पेंगुळतेय तुझी वाट पाहून पाहून
पण तू तू मात्र झालीस अस्तित्वहीन प्राण हरवलेली पुतळी

**किंवा**

**रसग्रहणः ( ४ )**

सांगती 'तात्पर्य' माझे सारख्या खोट्या दिशाः
" चालणारा पांगळा आणि पाहणारा आंधळा!"

माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य मी:
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा!'

वरील ओळींचे रसग्रहण करा.

## विभाग ३ - साहित्यप्रकार : कथा

[ १० ]

**कृती ३. खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** **( ४ )**

**( अ )** ( १ ) एका वाक्यात उत्तरे लिहा :

( य ) या गोष्टींमुळे कथाकथनाचे तंत्र अवगत होऊ शकते. ( १ )

( र ) कथा सादरीकरणात याचे भान ठेवावे लागते. ( १ )

कथेचे 'सादरीकरण' ही एक कला आहे आणि योग्य प्रयत्नाने ही कला साध्य होऊ शकते. विविध प्रकारच्या कथांचे मूकवाचन, प्रकट वाचन करण्याचा सराव, विविध कथा लेखकांची लेखनशैली समजून घ्यायचा केलेला प्रयत्न, भाषेची जाण, शब्दोच्चार आणि सादरीकरण कौशल्ये यांमुळे कथाकथन तंत्र अवगत होऊ शकते.

अभिवाचनामुळे कथा श्रोत्यांपर्यंत योग्यप्रकारे पोहोचण्यास मदत होते. कथेचे अभिवाचन एकाच वेळी जर अनेकांकडून केले गेले तर आवाजाचा एकसुरीपणा टळतो. संवादातील चढउतार, चटपटीतपणा, शब्दफेक यांतील विविधतेचा आनंद श्रोत्यांना मिळतो. कथेतील घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा यांचे आकलन होण्यास मदत होते. कथावाचनाला जर पार्श्वसंगीताची, प्रकाशयोजनेची, नेपथ्याची जोड दिली तर ते अभिवाचन श्रोत्यांवर चांगला परिणाम करते व दीर्घकाळ स्मरणात राहते. कथाकथन करणाऱ्या व्यक्तीला भाषेच्या ज्ञानाबरोबरच वाचिक अभिनयाचीही थोडी जोड द्यावी लागते.त्यामुळे कथाकथन उठावदार होते. कथाकथन करणाऱ्याला शब्दांच्या माध्यमांतून पात्रांना जिवंत करायचे असते. कथाकथन करणाऱ्या व्यक्तीला कथा सादर करायची असल्याने कोणताही लिखित मजकूर हातात नसतो. श्रोत्यांशी संवाद साधत, त्यांचा प्रतिसाद घेत, लेखकाच्या मूळ संहितेला धक्का न लावता; पण परिणामकारकरीत्या ती श्रोत्यांपर्यंत पोहोचवायची असते. कथेची निवड करणे फार महत्त्वाचे व तितकेच जबाबदारीचे काम असते. कथा सादरीकरणाचा कालावधी व श्रोत्यांचा अवधान काळ यांचे भान कथा सादरीकरणात ठेवावे लागते.

( २ ) कथाकथनात घ्यावयाची काळजी स्पष्ट करा. ( २ )

**( आ ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **( ६ )**

( १ ) घर सोडण्यामागचा अनुचा विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

( २ ) बोर्डींगमधला 'संपती' नावाचा मुलगा गेल्यानंतर बापू गुरुजींच्या भावना तुमच्या शब्दांत लिहा.

( ३ ) कथेच्या 'शोध' या शीर्षकाची समर्पकता तुमच्या शब्दांत पटवून द्या.

( ४ ) बोर्डिंगात शिकत असलेल्या व शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांचे बापू गुरुजींबद्दल असलेले प्रेम तुमच्या शब्दांत लिहा.

## विभाग ४ - उपयोजित मराठी

[ १४ ]

**कृती ४. ( अ )** खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : ( ४ )

( १ ) मुलाखतीचे प्रमुख हेतू तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

( २ ) अहवालाचे स्वरूप स्पष्ट करा.

( ३ ) वृत्तलेखनाचे स्वरूप लिहा.

( ४ ) माहितीपत्रकाचे वेगळेपण तुमच्या शब्दांत लिहा.

**( आ )** खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : ( १० )

( १ ) खालील मुद्यांच्या आधारे मुलाखतीची पूर्वतयारी स्पष्ट करा.

मुलाखतदात्याची वैयक्तिक माहिती ---मुलाखतदात्याचे कार्य ---मुलाखतीच्या अनुषंगाने वाचन-प्रश्नांची निर्मिती---अन्य मुलाखतींचे आकलन.

( २ ) माहितीपत्रकाची वैशिष्ट्ये खालील मुद्यांना धरून स्पष्ट करा.

माहितीला प्राधान्य ----उपयुक्तता ---वेगेळेपण--आकर्षक मांडणी--- भाषाशैली.

( ३ ) खालील मुद्यांच्या आधारे अहवाल लेखनाचे स्वरूप स्पष्ट करा.

अहवाल लेखनाचा हेतू --- माहितीचे संकलन --- आवश्यकता—महत्वाचा दस्तऐवज --- वस्तुनिष्ठ लेखन.

( ४ ) खालील मुद्यांच्या आधारे वृत्तलेखन लिहिताना विचारात घ्यायच्या बाबी लिहा.

वृत्तलेख --- वाचकांची अभिरूची --- वेगळेपण ---वाचकांचे लक्ष वेधणे—वृतलेखाची शैली.

## विभाग ५ - व्याकरण व लेखन [ २० ]

**व्याकरण घटक व वाक्प्रचार.**

**कृती ५. (अ)** सूचनेनुसार कृती करा : **( १०)**

( १ ) योग्य पर्याय निवडा ( १ )

( य ) पांढरा रंग सर्वांना आवडतो.

वरील वाक्याचे प्रश्नार्थक वाक्य ओळखा :

( १ ) आवडतो पांढरा रंग?

२ ) रंग कोणाला आवडत नाही?

( ३ ) सर्वांनाच पांढरा रंग आवडतो का?

( ४ ) कोणा कोणाला आवडतो पांढरा रंग?

( र ) खालील वाक्य होकारार्थी करा. ( १ )

दवाखान्यात मोठ्या आवाजात बोलू नये.

( २ )  सूचनेनुसार कृती करा : ( १ )

( य )  योग्य पर्याय निवडा

' प्रतिदिन' या सामासिक शब्दातील समास ओळखा.

( १ )  तत्पुरुष समास

( २ )  द्वंद्व समास

( ३ )  अव्ययीभाव समास

( ४ )  बहुव्रीही समास

( र ) 'नीलकमल' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा. ( १ )

( १ )  तत्पुरुष समास

( २ )  द्वंद्व समास

( ३ )  अव्ययीभाव समास

( ४ )  बहुव्रीही समास

( ३ )  ( य ) योग्य पर्याय  निवडा. ( १ )

मुले प्रदर्शनातील चित्रे पाहतात.

वरील वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.

( १ )  कर्मणी  प्रयोग

( २ )  कर्तरी प्रयोग

( ३ )  भावे प्रयोग

( ४ )  यापैकी नाही.

( र )  योग्य पर्याय निवडा. ( १ )

'भावे प्रयोग' असलेले वाक्य शोधून लिहा.

( १ )  मुले प्रदर्शनातील चित्रे पाहतात

( २ )  सैनिकांनी शत्रूस युद्धभूमीवर घेरले

( ३ )  कप्तानाने सैनिकांना सूचना दिली

( ४ )  तबेल्यातून घोडा अचानक पसार झाला

( ४ ) ( य ) ‘जो अंबरी उफाळतां खुर लागलाहे |

तो चंद्रमा निज तनूवरि डाग लाहे ||’

वरील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखा. ( १ )

( १ ) अनन्वय अलंकार

( २ ) अपन्हुती अलंकार

( ३ ) अतिशयोक्ती अलंकार

( ४ ) अर्थांन्तरन्यास अलंकार

( र ) ‘या दानासी या दानाहून अन्य नसे उपमान’ ( १ )

वरील काव्यपंक्तीतील उपमान ओळखा.

( ५ ) ( य ) ‘चारीमुंड्या चीत होणे’ या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायातून ओळखून लिहा. ( १ )

( १ ) माघार घेणे.

( २ ) पळून जाणे.

( ३ ) पराभूव होणे.

( ४ ) मुंड्या मोडणे.

( र ) ‘चारीमुंड्या चीत होणे ’या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा. ( १ )

( आ ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर सुमारे २०० ते २५० शब्दांत निबंध लिहा : ( १० )

( १ ) मी पाहिलेला अविस्मरणीय सामना

( २ ) माझा आवडता नेता

( ३ ) मी रायगड किल्ला बोलतोय

( ४ ) पाऊस पडला नाही तर.....

( ५ ) इंटरनेट काळाची गरज

***